# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला.

## कृषि नगर, अकोला – ४४४१०४ (महाराष्ट्र)

दुरध्वनी :०७२४- २२५८३७२ फॅक्स क्र.-०७२४-२२५८३८६


वाचाः- १. विद्यापीठ आदेश क्र बीबीए/एमआर/२००५ दिनांक १२ मार्च, २०१३.
२. महाराष्ट्र शासन निर्णय क्र वैखप्र-२०१६/प्र.क्र१६. /२०१६ राकावि-२ दिनांक १६ मार्च, २०१६.
३. कार्यकारी परिषद ठराव क्र काप/२७/२०१६ दिनांक ०८ जुलै, २०१६

**आदेश**

**क्र.बीबीए/एमआर/ २०१६** ९३ ६७ **दिनांक २९ जुलै, २०१६.**

ज्याअर्थी, संदर्भाधिन अनु क्र. २ वरील शासन निर्णयानुसार शासकीय कर्मचा-यांच्या वैद्यकिय खर्चाच्या प्रतिपुर्तीच्या कमाल मर्यादेच्या तरतुदीस अधिन राहुन वैद्यकिय खर्चाच्या प्रतिपुर्तीस मंजुरी प्रदान करण्याचे संबंधीत विभाग प्रमुखांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारामध्ये सुधारणा करून रू १,००,०००/- ऐवजी रू ३,००,०००/- पर्यत वाढ करण्यात आली आहे.

त्याअर्थी, आता असे आदेश देण्यात येत आहे की, डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठातील तसेच विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालये व शाळांमधील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांना वैद्यकीय खर्चाचे प्रतिपुर्तीस मंजुरी देण्याचे अधिकार खालील नमुद केल्याप्रमाणे सुधारीत करण्यास मान्याता प्रदान करण्यात येत आहे. तथापी जी महाविद्यालये, शाळा यांची आस्थापना स्वतंत्र आहे त्यांनी प्रचलीत शासन निर्णय, अटी व शर्तीच्या अधीन राहुन प्रकरणे त्यांच्या स्तरावर निकाली काढावीत.

१. प्रत्येक प्रकरणी रू ७५,०००/- पर्यतची वैद्यकिय प्रतिपूर्ती देयके मंजुर करण्याचे अधिकार कार्यलयप्रमुखां - व्यतिरिक्त सर्व अधिकारी / कर्मचा-यांचे बाबतीत संबधीत कार्यालय प्रमुखांना राहतील.
२. प्रत्येक प्रकरणी रू ७५,००१/- ते रू १,५०,०००/- पर्यतची वैद्यकिय प्रतिपूर्तीची देयके मंजुर करण्याचे अधिकार नियंत्रण अधिका-या व्यतिरिक्त सर्व अधिकारी / कर्मचा-यांच्या बाबतीत संबधीत नियंत्रण अधिका-यास राहतील.
३. प्रत्येक प्रकरणी सर्व अधिकारी /कर्मचा-यांची रू १,५०,००१ ते रू ३,००,०००/- पर्यतची वैद्यकिय प्रतिपूर्ती देयके मा. कुलगुरूंच्या मान्यतेने मंजुर करण्यात येतील.
४. प्रत्येक प्रकरणी कार्यालय प्रमुखांची व नियंत्रण अधिकारी यांची रू १,५०,०००/- पर्यतची वैद्यकिय देयके अनुक्रमे नियंत्रण अधिकारी व मा. कुलगुरू यांचे मान्यतेने मंजुर करण्यात येतील.

उपरोक्त आदेश विद्यापीठ हितार्थ वित्त विभागाच्या सहमतीने निर्गमीत करण्यात येत आहे. व त्यांची अमंलबजावणी संदर्भाधिन शासन निर्णयांचे दिनांका पासुन करण्यात यावी.

मा. कुलगुरूंचे मंजुरी व आदेशानुसार.

स्वाक्षरीत/-
कुलसचिव,
डॉ.पं.दे.कृ.वि., अकोला.